MHSN090000922017

# दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली

(पीठासिन अधिकरी श्री. किरण रा. खोंद्रे)

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ११/२०१७.**
**निशाणी क्रमांक २२ खालील आदेश**

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. शंकर कृष्णा पाटील. | **वादी.** |
| | ***विरुध्द*** | |
| ०१. | श्री. तानाजी दत्तू पवार, वगैरे. | **प्रतिवादी.** |

**(०१).** वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचेविरुध्द अतिक्रमित जमीनीचा खुला कब्जा मिळण्यासाठी व दरम्यानचे उत्पन्न मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी हे दावा कलम १अ या मिळकतीचा गटक्रमांक २८५ ही मालकी हक्काने वहिवाटीत असून प्रतिवादी यांची जमीन गटक्रमांक २८४ ही वादीच्या जमीनीच्या पूर्व बाजूस आहे. वादी यांनी प्रस्तुत दावा दाखल करण्यापूर्वी भुमी अभिलेख, तासगांव यांचेमार्फत मो.र.नं. ४४९६ प्रमाणे दिनांक २४.१०.२०१६ रोजी रितसर नोटीस काढून मोजणी करुन घेतली होती. परंतु प्रतिवादी यांनी सदर दाव्याचे कामी दिलेल्या कैफियतीमध्ये झालेली मोजणी मान्य व कबूल नसल्यांचे अगर ती त्यांचे अपरोक्ष झाल्यांचे कथन करुन झालेली मोजणी अमान्य केली आहे. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान हद्दीवरुन वाद आहेत. त्यामुळे दावा मिळकतीची टी. आय. एल. आर. यांचेमार्फत मोजणी

होवून त्यानुसार नकाशा तयार होणे आवश्यक आहे. सबब, वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीची मोजणी करणेसाठी टी. आय. एल. आर., तासगांव यांची कमिशनर म्हणून नेमणूक होवून त्याप्रमाणे मोजणी नकाशा व कमिशन रिपोर्ट व हद्दीच्या खुणा अतिक्रमित क्षेत्र नकाशात नमुद करणेबाबत आदेश करणेची विनंती वादी यांनी प्रस्तुत अर्जाव्दारे केली आहे.

**(०२).** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांचे म्हणणे मागवण्यात आले, परंतु प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. सबब, प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांचे विरुध्द 'विना म्हणणे' आदेश पारित करुन चालवण्यात आला.

**(०३).** वादीच्या अर्जामधील कथनांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान मिळकतीच्या हद्दीवरुन वाद आहेत. वादी यांनी दावा दाखल करण्यापूर्वी टी. आय. एल. आर., तासगांव यांचेकडून मोजणी करुन घेतल्यांचे कथन केले आहे. परंतु प्रतिवादी क्रमांक ०१ यांनी त्यांची कैफियत निशाणी क्रमांक १९ मध्ये कथन केले आहे की, वादीने ज्यावेळी मोजणी केली त्यावेळी वादी व प्रतिवादी यांच्या द्राक्षबागा वहिवाटीनुसार १७ ते १८ वर्षापासून वेगवेगळ्या अशा होत्या व आहेत. त्या वहिवाटीनुसार वादी व प्रतिवादी हे द्राक्षाची पिके घेत आलेली आहेत. वादी यांनी ज्यावेळी मोजणी केली त्यावेळी मोजणीदार यांनी लगतच्या कब्जेदार यांना नोटीसा दिलेल्या नाहीत. मोजणीदार यांनी मोजणीमध्ये दाखवलेले अतिक्रमण व स्केल हे चुकीचे आहे. प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण

झालेले नव्हते व नाही. गटक्रमांक २८४ व २८५ या गटाची वादी व प्रतिवादी यांची वेगवेगळी वहिवाट होती व मागील १७ ते १८ वर्षापासून द्राक्षबागा आहेत.

**(०४).** वादी यांनी प्रस्तुत अर्जाव्दारे टी. आय. एल. आर. तासगांव यांचेमार्फत मोजणी करावयाची मागणी केली आहे. वादीच्या मागणी अर्जास प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन कोणतीही हरकत घेतलेली नाही. त्यामुळे वादी यांचा अर्ज विना आव्हानीत राहिलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीची मोजणी करणेसाठी कमिशनर म्हणून तालुका निरिक्षक भुमी अभिलेख, तासगांव नेमणूक करण्याची विनंती केली आहे. सबब, प्रस्तुत कामी तालुका निरिक्षक भुमी अभिलेख, तासगांव यांचेमार्फत मोजणी करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. तालुका निरिक्षक भुमी अभिलेख (टि.आय.एल.आर.), तासगांव यांची नेमणुक मोजणी करणेसाठी कोर्ट कमिशनर म्हणून करण्यात येते.

०३. टि.आय.एल.आर., तासगांव यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी वादी यांचा गटक्रमांक २८५ व प्रतिवादी यांचा गटक्रमांक २८४ या मिळकतीची हद्द निश्चिती हेतु मोजणी करावी व गटक्रमांक २८५ मध्ये अतिक्रमण असलेस त्याबाबतचा अहवाल नकाशासह या न्यायालयास सादर करावा.

०४. टि.आय.एल.आर., तासगांव यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी मोजणी करणेपूर्वी मिळकतीची मोजणी करावयाची दिनांक व वेळ नमुद असलेली नोटीस नियमानुसार मिळकतीच्या लगत असलेल्या सर्व कब्जेदारांना द्याव्यात.

०५. वादी यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी मिळकतीच्या प्रस्तुत मोजणीची शासकिय नियमाप्रमाणे होणारी फी परस्पर सबंधीत कार्यालयात जमा करावी.

०६. वादी यांना पुढे असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी कमिशन रिट काढणेसाठी आवश्यक कागदपत्रे, उतारे, नकाशा इत्यादी त्वरीत जमा करावेत.

०७. वादी यांनी वरील बाबीची पुर्तता केल्यानंतर त्वरीत कमिशनपत्र काढण्यात यावे.

Kiran Rajaram Khondre
Digitally signed by Kiran Rajaram Khondre
Date: 2019.09.23 17:13:09 +0530

**तासगांव.** (किरण रा. खोंद्रे)
दिनांक : २३ सप्टेंबर २०१९. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. रुपेश शिवाजी पोळ.

न्यायालय – दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली.

दिनांक – २३ सप्टेंबर २०१९.

न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक – २३ सप्टेंबर २०१९.

आदेश अपलोड दिनांक – २४ सप्टेंबर २०१९.